**नियमित फौजदारी खटला क्र. १४५/२०१८**
**निशाणी क्रमांक ३५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ चा जबाब.**
**मी शपथेवर कथन करतो की,**

**माझे नांव** : चंद्रकला सुनिल गांगुर्डे
**वय** : ४९ वर्षे , **व्यवसाय :** शेती
**राहणार** : उंबरखेड, ता.निफाड.

**सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. एस.एल.जोरवर यांचेमार्फत-**

१. आमची उंबरखेड शिवारात गट क्र.५५८/२ मध्ये शेती आहे. आमच्या शेजारी आरोपी क्र.१ मधुकर संपत गांगुर्डे यांची जमीन असुन त्यांचा गट क्र.५५९ आहे. पुर्वी आमची शेती गट क्र. ५५८/२ ही आरोपी मधुकर संपत गांगुर्डे व त्यांचे भाउ करत होते आणि त्यांच्या नावावरची गट क्र.५५९ आम्ही करत होतो. आमच्या गटा शेजारी गट क्र.५६० आहे. गट क्र.५५९ मधील काही मिळकत आम्ही करतो तर काही मिळकत आरोपी करतात. गट क्र.५५८/२ ही फक्त आम्ही करतो.

२. दि.२८/०६/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वा. मी, माझे अशोक गांगुर्डे आणि जाउ सुनिता अशोक गांगुर्डे असे आम्ही गट क्र.५५८/२ मधील शेतात कॉग्रेस गवत काढत होतो. तेव्हा आरोपी क्र. १ ते ३ त्याठिकाणी आले आणि माझे दिर अशोक यांना शिवीगाळ करु लागले. तेव्हा आरोपी क्र.१ ते ३ अशोक गांगुर्डे यांना म्हणाले की, ही जमीन आमची आहे, ही जमीन तुम्ही करायची नाही. तेव्हा माझे दिर अशोक गांगुर्डे त्यांना म्हणाले की, गट क्र.५५८/२ हे आमच्या नावावर असल्याने ते आम्हीच करणार. तेव्हा आरोपी क्र.१ मधुकर संपत गांगुर्डे यांनी माझ्या दिराला शिवीगाळ करुन मधुकर यांनी त्यांच्या हातातील लाकडी दांडयाने अशोक गांगुर्डे यांच्या डाव्या खांद्याजवळ मारले. आरोपी क्र.२ व ३ यांनी अशोक गांगुर्डे यांना लाथाबुक्यांनी मारले. तेव्हा मी आणि सुनिता गांगुर्डे यांनी सोडावा सोडव केली. लाकडी दांडा मारल्यामुळे अशोक गांगुर्डे यांच्या डाव्याच्या हाताच्या खांद्यावर सुज आली होती. आरोपींनी परत या जमिनीत आला तर तुम्हांला जिवे ठार मारु असा दम दिला होता.

३. माझ्या दिराला मारल्यामुळे आम्ही तेथुन रस्त्याकडे पळालो होतो. आमचा आवाज ऐकुन दत्तु नाकुडे व संजय पानसरे त्याठिकाणी आले. त्या दोघांनी मधुकर संपत गांगुर्डे यांना समजावुन सांगितले. त्यानंतर आम्ही अशोक गांगुर्डे यांना घेवुन पिंपळगांव पोलीस ठाण्यात आलो. पोलीसांच्या सांगण्यावरुन आम्ही सरकारी दवाखाना पिंपळगांव येथे उपचाराकामी गेलो. पिंपळगांव येथील सरकारी दवाखान्यातुन अशोक गांगुर्डे यांना पुढील उपचाराकामी नाशिक येथील सिव्हील हॉस्पीटल येथे पाठवले. अशोक गांगुर्डे यांचे डाव्या खांद्याचे हाड मोडल्यामुळे नाशिक येथील सिव्हील हॉस्पीटल मधील डॉक्टरांनी ऑपरेशन करण्यास सांगितले.

तेथे ऑपरेशनला वेळ लागत असल्याने तेथुन आम्ही डिसचार्ज घेतला. तेथुन आम्ही अशोक गांगुर्डे यांना गुरुकृपा हॉस्पीटल, पिंपळगांव येथे दाखल केले.

४. गुरुकृपा हॉस्पीटल, पिंपळगांव येथे अशोक गांगुर्डे यांच्या खांद्याची शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्यांना दि.११/०७/२०१८ रोजी डिसचार्ज मिळाला. त्यानंतर वर नमुद घटनेबाबत त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. आरोपी क्र.१ यांनी अशोक गांगुर्डे यांना ज्या लाकडी दांडयाने मारले होते तो लाकडी दांडा मी अनेक वर्षांपुर्वी पाहिलेला असल्यामुळे मी आता तो ओळखु शकले याबाबत सांगता येत नाही. मला आता **आर्टिकल-अ** वरील लाकडी दांडा दाखवला. याच लाकडी दांडयाने आरोपी क्र.१ ने अशोक गांगुर्डे यांच्या डाव्या खांद्यावर मारले होते. आरोपी क्र.१ ते ३ हे आमचे चुलत चुलत दिर असल्यामुळे मी त्यांना ओळखते. आजरोजी आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री आर.आर.मुंदडा यांच्यामार्फत...**

५. हे म्हणणे खरे नाही की, पुर्वी आम्ही आणि आरोपी ऐकमेकांच्या नावावरील शेतजमिन करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर सुमारे १५ दिवसानंतर पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. हे म्हणणे खरे आहे की, गुरुकृपा हॉस्पीटल, पिंपळगांव हा खाजगी दवाखाना आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०६/२०१८ रोजी आमच्यासोबत इतर मजुर बायका देखील कॉंग्रेस गवत काढण्यासाठी हजर होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यामध्ये रस्त्याचा वापर करणेबाबत, रस्त्याने जावुन येवुन देणेबाबत दिवाणी दावा या न्यायालयात प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी आमच्यावर नियमीत फौजदारी खटला ३६८/२०१८ दाखल केला असुन तो प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/०६/२०१८ रोजी मी आरोपी क्र.१ च्या गालावर चापट मारली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०६/२०१८ रोजी, मी, सुनिल गांगुर्डे, अशोक गांगुर्डे यांनी आरोपी क्र.१ ते ३ यांना मारहाण केली होती.

६. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगण्याप्रामणेच नोंदवला होता. गट क्र.५५८/२ मधील काही जमीन आम्ही करत होतो व काही जमीन आरोपी करत होते असा मजकुर मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितला होता परंतु सदर मजकुर माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. अशोक गांगुर्डे नाशिक येथील सिव्हील हॉस्पीटल येथे उपचार घेत असतांना तेथील डॉक्टरांनी त्यांचे खांद्याचे हाड मोडले असुन ऑपरेशनकामी वेळ लागेल असे सांगितल्याचा मजकुर मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितला होता परंतु सदर मजकुर माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद दोन्ही बाबी घडलेल्या नसल्यामुळेच पोलीसांनी घेतलेल्या माझ्या जबाबात नमुद नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/०६/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वा. मी, माझे अशोक गांगुर्डे आणि जाउ सुनिता अशोक गांगुर्डे असे आम्ही गट क्र.५५८/२ मधील शेतात कॉग्रेस गवत काढत होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा आरोपी क्र.१ ते ३ त्याठिकाणी आले आणि माझे दिर अशोक यांना शिवीगाळ करु लागले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा आरोपी क्र. १ ते ३ अशोक गांगुर्डे यांना म्हणाले की, ही जमीन आमची आहे, ही जमीन तुम्ही करायची नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा माझे दिर अशोक गांगुर्डे त्यांना म्हणाले की, गट क्र.५५८/२ हे आमच्या नावावर असल्याने ते आम्हीच करणार हेर मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा आरोपी क्र.१ मधुकर संपत गांगुर्डे यांनी माझ्या दिराला शिवीगाळ करुन मधुकर यांनी त्यांच्या हातातील लाकडी दांडयाने अशोक गांगुर्डे यांच्या डाव्या खांद्याजवळ मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांनी अशोक गांगुर्डे यांना लाथाबुक्यांनी मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा मी आणि सुनिता गांगुर्डे यांनी सोडावा सोडव केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, लाकडी दांडा मारल्यामुळे अशोक गांगुर्डे यांच्या डाव्याच्या हाताच्या खांद्यावर सुज आली होती. आरोपींनी परत या जमिनीत आला तर तुम्हांला जिवे ठार मारु असा दम दिला होता हे मी खोटे सांगत आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घरी मोटारसायकल व टॅक्टर आहे. हे म्हणणे खरे नाही की, अशोक गांगुर्डे त्यादिवशी मोटारसायकलवरुन पडल्यामुळे त्यांच्या डाव्या हाताच्या खांद्याजवळ मार लागुन फ्रॅक्चर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने अशोक गांगुर्डे यांच्या डाव्या खांद्याजवळ लाकडी दांडयाने मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेनंतर सुमारे १५ दिवसांनी आम्ही आपसात विचार करुन खोटी फिर्याद देवुन खोटे जबाब दिले. हे म्हणणे खरे नाही की, लाकडी दांडा आर्टिकल-अ हा शेतात कुठेही सहज उपलब्ध होतो. हे म्हणणे खरे नाही की, लाकडी दांडा आर्टिकल अ हा आम्हीच पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, नियमीत फौजदारी खटला ३६८/२०१८ मध्ये आम्हांला शिक्षा होवु नये म्हणुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**माझे समक्ष**

**श्रवणोत्तर स्विकृती**

KOLEKAR PRASAD DIPAK
Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.10.16 16:22:40 +0530

**दिनांक : १६/१०/२०२५**

**( पी. डी. कोळेकर )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**पिंपळगांव (ब)**